**प्रेस नोट** **दि.१७/०३/२०१९**

## स्वारगेट पोलीस स्टेशन

## रिक्षामध्ये विसरलेला मोबाईल तात्काळ परत दिला

दि.१६/०३/२०१९ रोजी सायंकाळी १८.०० वा चे सुमारास निर्मलकुमार बाजपेयी,रा.सॅलिसबरी पार्क,पुणे हे सॅलिसबरी पार्क ते क्वॉर्टर गेट असा रिक्षाने प्रवास करीत असताना त्यांचा विवो कंपनीचा मोबाईल चुकुन रिक्षामध्ये विसरुन राहिला.

सदर ॲटो रिक्षा नं. एमएच १२ जेएस ८९४० वरील चालक - राजु रामभाऊ वधे,रा.अप्पर इंदीरानगर,बिबवेवाडी,पुणे यांनी सदरचा मोबाईल महर्षीनगर पोलीस चौकी येथे आणुन जमा केला. सदर मोबाईल मधील माहितीवरुन पोलीस नाईक ५६६९ थोरात व पोशि हंबर्डे यांनी मोबाईल मालकाचा शोध घेतला असता. सदरचा मोबाईल हा निर्मलकुमार बाजपेयी, रा.सॅलिसबरी पार्क, पुणे यांचा असल्याचे समजले. निर्मलकुमार बाजपेयी, रा.सॅलिसबरी पार्क, पुणे यांना महर्षीनगर पोलीस चौकी येथे बोलावुन त्यांना त्यांचा मोबाईल परत दिला. त्यावेळेस निर्मलकुमार बाजपेयी,रा.सॅलिसबरी पार्क,पुणे यांनी पोलीसांचे व रिक्षा चालक राजु वधे यांचे आभार मानले.






प्रेसनोट दिनांक ०२/०३/२०१९

श्री विजय एकनाथ खोमणे, पोलीस नाईक, ब.नं. ४७८३, यांना दिनांक २६/०२/२०१९ रोजी सकाळी ०९.०० ते २१.०० वा.पर्यंत स्वारगेट एस.टि.स्टॅन्ड येथे पेट्रोलिंग डयुटीकामी नेमले असता,पेट्रोलिंग दरम्यान एक इसम संशयित इसम स्वारगेट एस.टी. स्टॅन्ड च्या आवारात फिरत असताना दिसुन आल्याने त्यास हटकले असता,तो पळुन जाण्याच्या तयारीत असताना लागलीच पोलीस नाईक खोमणे यांनी त्याचा पाठलाग करुन पकडुन व त्यास ताब्यात घेवुन स्वारगेट पोलीस स्टेशन येथे आणुन तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांचे ताब्यात देवुन तपास पथकातील अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी त्याच्याकडे अधिक तपास करता त्याने आपले नांव आहत जहर मंडल,वय ३० वर्षे, रा. मु. पो. पदोमाला, शिक्राकोलोनी, ता.- चापरा, जि. नदीया, कोलकात्ता, पश्चिम बंगाल,सध्या रा.एकबोटे कॉलनी,रुम नंबर ०३,घोरपडी पेठ,पुणे असे असल्याचे सांगीतले.तपासात निष्पन्न झाले कि त्याने व त्याचा साथीदार पंकज देशपांडे, स्वारगेट एस.टी.स्टॅन्ड येथे येवुन शिवशाही बसमधील प्रवाशांनी रॅकमध्ये लॅपटॉप ठेवलेल्या बॅगा चोरुन नेत असल्याची कबुली दिली.तसेच आतापर्यंत स्वारगेट एस.टी.स्टॅन्ड मधुन वेळोवेळी एकुण ०९ लॅपटॉप चोरी केल्याची कबुली दिली आहे.

याबाबत राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक श्रीमती यामिनी जोशी यांचे हस्ते पो.ना.विजय खोमणे यांचा स्वारगेट एस.टी.स्टॅन्ड येथे सत्कार करुन आभार मानले.

(अशोक कदम)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
स्वारगेट पोलीस स्टेशन,पुणे